# महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईन्ट,
मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : (०२२) २०२५३५४
२०२६२४९, २८३५२४७
तार : पाणी मंडळ
फॅक्स : (९१) ०२२-२०२९३४

दिनांक : 14 फेब्रुवारी, 1997.

जा.क्र.मपापुवर्जानमं/सस/इतवृत्त.

**विषय : महाराष्ट्र पा.पु.व ज.नि. मंडळाची 70 वी सभा..**

इतवृत्तास मंजूरी..

दिनांक 2.1.97 दिनांक 15.1.97 व दिनांक 22.1.97 रोजी महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाची 70 वी सभा मंडळाचे अध्यक्ष तथा मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर सभेचे इतवृत्त मंजूरीसाठी सोबत सादर करीत आहे.

( राजेंद्र सगणे,)
सदस्य सचिव.

**सहपत्र :** इतवृत्त.

प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.

मा.उपाध्यक्ष, म.पा.पु.व ज. मंडळ
व राज्यमंत्री, नगरविकास तथा पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

मा. अध्यक्ष, म.पा.पु.व ज.नि मंडळ व मंत्री,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.

# महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाची 70 वी सभा गुरुवार दिनांक 2.1.1997 रोजी सकाळी 9.30 वा., बुधवार दिनांक 15.1.1997 रोजी दुपारी 2.00 वाजता व बुधवार दिनांक 22.1.1997 रोजी दुपारी 12.00 वाजता संपन्न झाली. हया सभांना उपस्थित असलेल्या सदस्यांची यादी सोबत जोडली आहे. या तिन्ही सभांचे इतिवृत्त खालीलप्रमाणे आहे.

## दिनांक 2 जानेवारी 1997 रोजीची मंडळाची 70 वी सभा.

मंडळाचे सदस्य सचिव, श्री.राजेंद्र सगणे, यांनी प्रथम मा.श्री.अण्णासाहेब डांगे, अध्यक्ष, म.पा.पु. व ज.नि.मंडळ यांचे व उपस्थित सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेस सुरवात करण्याची अनुमती घेतली व मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना विषय मांडण्याची सुचना केली.

**कार्यक्रम बाब क्र.1** :– 69 व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

मंडळाने प्रसृत केलेल्या इतिवृत्तावर कोणत्याही सदस्याची सुचना वा आक्षेप आले नसल्याने इतिवृत्तास मान्यता देण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र.2** :– मंडळाच्या 69 व्या सभेतील बाबींवर करण्यांत आलेली कृती.

मंडळाच्या 69 व्या सभेमध्ये ज्या कार्यक्रम बाबींवर चर्चा झाली होती व निर्णय घेण्यांत आलेले होते, त्यावर करण्यांत आलेल्या कार्यवाही बाबतची कल्पना मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी दिली. त्यांत काही बाबींवर झालेली चर्चा खालीलप्रमाणे.

**कार्यक्रम बाब क्र.3 (बैठक क्र.69)** :– मंडळाच्या अभियंत्यांना सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत.

शासनाने नेमलेल्या त्रुटी समितीकडे प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे असे सांगण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.4 ते 6 (बैठक क्र.69)** :– वसई–विरार उप प्रादेशिक पाणी पुरवठा योजना निविदांबाबत.

वसई–विरार उप प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या निविदांबाबत चर्चा झाली त्यावेळी मा. अध्यक्षांनी मंडळाच्या सभेतील निर्णयांची माहिती लगेच बाहेर जाते व त्यांना वर्तमानपत्रात प्रसिध्दी मिळते असे नजरेस आणून दिले व हे टाळण्याच्या सूचना दिल्या.

**कार्यक्रम बाब क्र.12 (बैठक क्र.69)** :– विळद योजनेवरील आस्थापना मंजूर करणेबाबत.

या प्रकरणी मा.अध्यक्षांनी, मंत्रालयीन स्तरावर, अध्यक्ष, नगरपालिका, अहमदनगर, यांचेशी चर्चा करुन विळद पाणी पुरवठा योजना हस्तांतरणासंबंधीच्या समस्यांवर लवकरच निर्णय घेण्याचे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र13(बैठक क्र.69)** :– मुख्य अभियंता कार्यालयाची निर्मिती.

यावर विस्तृत चर्चा झाली. त्यावेळी नवीन पदे भरतांना ती प्रतिनियुक्तीने अथवा कंत्राटी पध्दतीने ठराविक कालावधीसाठी भरावीत. तसेच मंडळातील अत्युत्कृष्ठ दर्जाच्या अभियंत्यांना विशेष पदोन्नती देवून भरावीत असे मा.उपाध्यक्षांनी सुचविले. तेंव्हा या प्रश्नावर मा.अध्यक्षांकडे स्वतंत्र सभा आयोजित करुन निर्णय घेण्याचे ठरविण्यांत आले व त्याप्रमाणे दि. 9.1.97 रोजी सभा आयोजित करण्याचेही ठरले.

**कार्यक्रम बाब क्र.16(बैठक क्र.69)** :– स्थानिक संस्थांकडील वसूलीबाबत.

स्थानिक संस्थांकडून येणे असलेल्या हमी शुल्क थकबाकीच्या रक्कमेवर, शासन निर्णयाप्रमाणे, दंडनिय व्याज [आकारणी] आकारणे तसेच गेली दहा वर्षे न वाढविलेला पाणीपट्टी दर नगरपालिका व महानगरपालिकेच्या वर्गाप्रमाणे पाण्याचे दर वाढविण्याविषयीही सुचना मा.उपाध्यक्षांनी केल्या (ग्रामीण भाग वगळता). तसेच हे दर मंडळानेच ठरवून देणे योग्य होईल कां याबाबत विचार करण्याचे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र.18(बैठक क्र.69)**:– मा.सदस्य सचिव यांच्या निवासस्थानाकरिता फ्लॅट विकत घेणे.

मंडळातील उच्चपदस्थ अधिका–यांना निवासस्थाने व मंडळाचे मुख्यालय एकत्रित येण्याकरिता मुंबईत बी.एम.आर.डी.ए. कडून जागा मिळविण्याविषयी मा.मुख्यमंत्री, यांचेकडे चर्चा करण्यासंबंधी बैठकीचे आयोजन करण्याची सुचना मा.उपाध्यक्षांनी केली व ती मान्य करण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र.25(बैठक क्र.69)** :– राकेश पटेल, चंद्रपूर यांचे प्रकरण.

यासंबंधी मा.अध्यक्षांनी असे सूचित केले की, हा अकृषिक दर रद्द करुन कृषीक म्हणून कमी करण्यासाठी शासनाकडे पत्रव्यवहार करण्यांत यावा. परंतू यापूढे अशी प्रकरणे निर्माण होणार नाहीत या दृष्टीने अशा जागांसाठी आवश्यक असलेल्या कालावधीसाठी अकृषिक दर प्रथम महसूल खात्याकडून मंजूर करुन घेण्यांत यावा.

**कार्यक्रम बाब क्र.31(बैठक क्र.69)** :– मंडळाची स्वत:ची जागा असल्याने माणगांव येथेच विभागीय कार्यालय ठेवावे व त्या जागेत कर्मचा–यांसाठी निवासस्थाने बांधावीत असे ठरले.

## टेबल कार्यक्रम बाबी.

**कार्यक्रम बाब क्र.1(बैठक क्र.69)** :– ब्रिटीश शासन अर्थसहाय्यित पाणी पुरवठा व स्वच्छता प्रकल्प जळगांव जिल्हयातील 42 व नाशिक जिल्हयातील 56 खेडयांच्या योजनांकरिता चाचणी.

या प्रकरणी विस्तृत चर्चा होऊन मा.उपाध्यक्षांनी अशा सुचना दिल्या की, जेवढया गावांत कामे पूर्ण झालेली आहेत तेवढया गावांचा पाणी पुरवठा त्वरीत चालू करुन योजना कार्यान्वित करावी.

**कार्यक्रम बाब क्र.3** :– प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना जिल्हापरिषदांकडे हस्तांतरीत करणेबाबत.

याबाबत विस्तृत चर्चा होऊन चर्चेअंती असे ठरविण्यांत आले की, या प्रकरणी सर्व जिल्हापरिषद मुख्याधिका–यांची बैठक आयोजित करुन त्यांना योजना कर्मचा–यांसह ताब्यात घेण्याबाबत सुचना देण्यांत याव्यात.

**कार्यक्रम बाब क्र.4** :– वैद्यकीय खर्चाची कमाल मर्यादा वाढविण्याबाबत.

कार्यक्रम बाब मंजूर करण्यांत येऊन खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

**ठराव :–**

ठराव करण्यांत येतो की, वैद्यकीय खर्चाची वार्षिक मर्यादा रु.400 /– आणि 500 /– वरुन रु.1000 /– ते 1200 /– एवढया रक्कमेने वाढविण्यांत येत आहे. या रक्कमेत आंतररुग्ण व बाह्रुग्ण म्हणून घेतलेल्या शासकीय /मंडळमान्यताप्राप्त रुग्णालयातील उपचारावरील रक्कमेचा अंतर्भाव असणार नाही. तसेच आकस्मिक आजारावर खाजगी रुग्णालयामधून आंतररुग्ण म्हणून घेतलेल्या औषधोपचाराच्या रक्कमेचाही अंतर्भाव असणार नाही.

**कार्यक्रम बाब क्र.5** :– मंत्रीमंडळाने जीवन विकास प्राधिकरणासाठी मंजूर केलेल्या अतिरिक्त मुख्य अभियंता /अधीक्षक अभियंता, इ.पदांसाठी सहाय्यक कर्मचारी वर्ग निर्माण करणे.

या प्रकरणी विस्तृत चर्चा होऊन सदर कार्यक्रम बाब मंजूर करण्यांत आली. चर्चेच्या वेळी, ही नवीन पदे प्रतिनियुक्तीने अथवा कंत्राटी पध्दतीवर भरण्यांत यावी असे मा.उपाध्यक्षांनी सुचविले तेव्हां मा. अध्यक्षांनी असे सुचविले की, याबाबत त्वरीत स्वतंत्र सभा आयोजित करण्यांत येऊन या प्रकरणी लवकरच निर्णय देण्यांत यावा (प्रतिनियुक्ती /नेमणूक /पदोन्नती संबंधी धोरण ठरविणे) त्यानुसार सदर विषय दि.9.1.97 रोजी होणा–या सभेत ठेवण्यांत यावा.

**कार्यक्रम बाब क्र.6** :– मंडळातील अभियंत्यांना आपल्या खात्याव्यतिरिक्त इतर खात्यातील तांत्रिकी छाननीची व तांत्रिकी प्रस्तावास मंजूरी देण्याची कामे केल्याबद्दल अतिरिक्त तांत्रिकी भत्ता मंजूर करण्याबाबत.

यावर साधकबाधक चर्चा होऊन ठराव मंजूर करणेत आला. तसेच (1) या भत्त्याची कमाल मर्यादा शासनाप्रमाणेच असावी (2) 1993 पासून पूर्वलक्षी प्रभावाने तो देण्यांत यावा असेही ठरले व (3)तसेच या अधिका–यांमध्ये म.नि.स.व स.कक्षा मधील व मुख्य अभियंत्यांच्या कार्यालयांतील अधिका–यांचाही समावेश करण्याचे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र.7** :– मंडळाचे काम त्वरेने व सुलभतेने होण्याच्या दृष्टीने मंडळाला अधिकार प्रदान करणे.

या विषयावर विस्तृत चर्चा होऊन यात अंतर्भूत असलेल्या प्रस्तावित यादीमधील अ.क्र. 8,10,11,12,13 हे वगळता अ.क्र.1 ते 7 व 9 वरील अधिकार मंडळाला देण्यास मान्यता देऊन खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

**ठराव :–**

असा ठराव करण्यांत येतो की, वरील यादीला शासनाची मान्यता घेण्यांत यावी व त्या शासन मान्य यादीमधील बाबीसंबंधी शासन वेळोवेळी जे आदेश निर्गमित करेल ते आदेश मंडळातील अधिका–यांना व कर्मचा–यांना आपोआप लागू करण्यांत यावेत व याबाबतची कार्यवाही करण्याचे प्राधिकार मंडळाच्या सदस्य सचिवांना देण्यांत यावेत.

**कार्यक्रम बाब क्र.8** :– मंडळाच्या वित्त व लेखा शाखेतील विविध पदांच्या विभागीय परिक्षेचे नियम.

या बाबीवर खालीलप्रमाणे ठराव मंजूर करणेंत आला.

**ठराव :–**

ठराव करण्यांत येतो की, मंडळाच्या वित्त व लेखा शाखेतील विविध पदांसाठीच्या प्रस्तावित विभागीय परिक्षा नियमांना व अभ्यासक्रमास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच या ठरावाद्वारे प्रस्तावित विभागीय परिक्षा नियमांना शासनाची मंजूरी मिळविण्यासाठी पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार मंडळाच्या सदस्य सचिवांना देण्यांत येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र.9** :– मंडळाच्या वित्त व लेखा संवर्गातील विविध पदांच्या सेवाभरतीचे नियमांत सुधारणा.

या बाबींवर खालीलप्रमाणे ठराव मंजूर करणेंत आला.

**ठराव :–**

ठराव करण्यांत येतो की, मंडळाच्या वित्त व लेखा शाखेतील प्रस्तावित सेवा भरतीच्या नियमांना परिशिष्ट 1,2,3 मध्ये दर्शविल्याप्रमाणे सुधारणा /बदल करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच या ठरावाद्वारे सेवा भरतीच्या नियमांना या सुधारणांसह शासनाची मान्यता मिळविण्यासाठी पुढील कार्यवाही करण्याचे अधिकारी मंडळाच्या सदस्य सचिवांना देण्यांत येत आहेत.

कार्यक्रम बाब क्र.10 ते 15 वेळेअभावी पुढील सभेत घेण्याचे ठरवून आयत्या वेळच्या कार्यक्रम बाबी मधील टेबल कार्यक्रम बाब क्र.1 ते 6 व 8 पुढे ढकलण्यांत येऊन टेबल कार्यक्रम बाब क्र.7 व 9 वर चर्चा करण्यांत आली.

**टेबल कार्यक्रम बाब क्र.7** :– मोरबे धरणाचे कामाबद्दल.

या विषयावर विस्तृत चर्चा होऊन काही बाबींवर माहिती आवश्यक असल्याने ही बाब सविस्तर माहितीसह व कंत्राटदारामुळे किती विलंब झाला या माहितीसह ~~पुढील बैठकीत विचारार्थ ठेवावा असे मा.अध्यक्षांनी आदेश दिले.~~ ~~मा. अध्यक्षांशी [illegible] निर्णय [illegible] आला.~~

(6)

**टेबल कार्यक्रम बाब क्र.9** :- नागपूर येथील शासकीय बंगले क्र.70 ।1 व 69 ।1 रिक्त करण्याबाबत.

सदरहू बंगले मागील 40 वर्षापासून पाणी पुरवठा संबंधीच्या आपल्या खात्याकडे ।मंडळाकडे असल्याने व मंडळाची स्थापना झाल्यानंतर पाणी पुरवठा योजना ।केंद्रे याच बरोबरा त्यासंबंधीच्या स्थावर मालमत्ता मंडळाकडे वर्ग करण्यांत आल्याने, त्यावर आता मंडळाचीच मालकी आहे. म्हणून हे बंगले आता पुन्हा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तरी याप्रमाणे सा.बां.वि. ।जिल्हाधिकारी यांना पत्रव्यवहाराद्वारे कळविण्यांत यावे. अशी आग्रहाची भूमिका मा.अध्यक्ष. यांनी घेऊन खालीलप्रमाणे ठराव सभेने संमत केला.

**ठराव :-**

असे ठरविण्यांत आले की. सदरहू बंगले मागील40 वर्षापासून पाणी पुरवठयासंबंधीच्या शासकीय खात्याकडे व नंतर मंडळाकडे असल्याने व मंडळाची स्थापना झाल्यानंतर पाणी पुरवठा योजना/केंद्रे याच बरोबर त्या संबंधीची स्थावर मालमत्ता मंडळाकडे वर्ग करण्यांत आल्याने त्यावर आता मंडळाचीच मालकी आहे. म्हणून हे बंगले आता पुन्हा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. ही मंडळाची ठाम भूमिका सार्वजनिक बांधकाम विभाग/जिल्हाधिकारी यांना कळविण्यासाठी मा.सदस्य सचिव यांना अधिकृत करण्यांत येत आहे.

७० वी सभा (४)

दिनांक २५ जानेवारी १९९८ रोजी झालेल्या सभेचे

इतिवृत्त

(९)

<u>दिनांक 15 जानेवारी 1997 रोजीची मंडळाची बैठक.</u>

दिनांक 2 जानेवारी 1997 (गुरुवार) रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या 70 व्या सभेत चर्चा न झालेल्या कार्यक्रम बाबींवरील चर्चेसाठी दिनांक 15.1.1997 रोजी आयोजित करण्यांत आलेल्या सभेचे इतिवृत्त.

सदरहू सभेस सोबत जोडलेल्या या परिशिष्टा प्रमाणे सदस्य उपस्थिती होते.

मंडळाचे सदस्य सचिव श्री.राजेंद्र सगणे यांनी प्रथम मा.श्री.अण्णासाहेब डांगे, अध्यक्ष, म.पा.पु व ज.नि.मंडळ व उपस्थित सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेस सुरवात करण्यास सभागृहाची अनुमती घेतली व त्यानंतर सभेपुढील विषय मांडण्यास सुरवात केली.

**<u>70 व्या बैठकीतील कार्यक्रम बाब क्र.10</u>** :– अकोला येथे प्रकल्प विभागाकरिता मंडळाच्या आकस्मिक निधीतून मंडळाच्या मालकीची इमारत बांधणे.

सदर कार्यक्रम बाब मंडळाचे सदस्य सचिवांनी विषद केल्यानंतर, या प्रकरणी विस्तृतपणे चर्चा झाल्यानंतर, कार्यक्रम बाब मान्य झाली व खालीललप्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

<u>ठराव :–</u>

अकोला प्रकल्प विभागांतर्गत पांच तांत्रिक पथके असुन ती सर्व अकोला स्थित आहेत. प्रकल्प विभाग व तांत्रिकी पथके मिळून एकूण 90 कर्मचारी।अभियंता वर्ग प्रकल्प विभागाता काम करीत आहेत. यास्तव सर्व कर्मचारी वर्गास एकूण 623 चौ.मिटर जागेची आवश्यकता आहे. सध्या हे कार्यालय खाजगी इमारतीमध्ये भाड्याने आहे. ही इमारत गैरसोईची असून घरमालक ही इमारत रिकामी करण्याबाबत सतत तगादा लावत आहे. प्रकल्प विभागाला लागणारी 623 चौ.मिटर चटईक्षेत्र असलेली इमारत अकोला शहरात भाड्याने मिळणे कठीण असल्यामुळे मंडळाच्या मालकीची स्वतंत्र इमारत असणे नितांत गरजेचे आहे. म्हणून प्रकल्प विभागाकरिता अकोला येथे रु. 43,70,700 ।– किंमतीची, मंडळाच्या मालकीची, इमारत मंडळाच्या ' कार्यालयीन इमारत ' या लेखाशिर्षामधून बांधण्यांत यावी व याबाबतचे सर्व अधिकार मा.सदस्य सचिव यांना देण्यांत यावेत.

**<u>कार्यक्रम बाब क्र.11</u>** :– महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या आस्थापनेवर सहाय्यक कामगार अधिकारी रु.1640–2900 या वेतनश्रेणीतील पदे निर्माण करणेबाबत.

सदर बाबीवर विस्तृत माहिती मंडळाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी सभेपुढे ठेवली व मागील सभेत या विषयावर मा.उपाध्यक्षांनी सुचित केल्याप्रमाणे मंडळामध्ये प्रलंबित असलेली न्यायालयीन प्रकरणे किती आहेत याचा गोषवारा सभेपूढे ठेवण्यांत आला. त्यावर विस्तृत चर्चा होऊन सभेने या कार्यक्रम बाबीस मान्यता दिली. ही पदे कॅबिनेटने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला दिलेल्या अधिकारात मंजूर करण्यांत यावीत म्हणून खालीलप्रमाणे ठराव पारीत करणेत येत आहे.

(10)

__ठराव :-__

असा ठराव करण्यांत येत आहे की, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळास सहाय्यक कामगार अधिकारी यांची रु.1640-2900 या वेतनश्रेणीत सहा (6) पदे शासनाने प्राधिकरणास दिलेल्या अधिकारान्वये मंजूर करुन घेण्यास मंडळ मान्यता देत आहे. या संदर्भात योग्य ती पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार सदस्य सचिवांना देण्यांत येत आहेत.

__कार्यक्रम बाब क्र.12__ :- टंकलेखक म्हणून दिलेला विकल्प स्विकारणेबाबत.

सदर कार्यक्रम बाब मंडळापुढे मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी विषद केली. त्यावर सविस्तर चर्चा होऊन सभेने असा निर्णय घेतला की, अशी प्रकरणे मंडळात किती आहेत व या प्रकरणात कोणाकडून व किती विलंब झाला याचा अहवाल गोषवा-यासह पुढील सभेत सादर करावा व ही कार्यक्रम बाब पुढील सभेत ठेवण्याच्या सुचना दिल्या.

__कार्यक्रम बाब क्र.13__ :- अहमदनगर येथील विळद वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी कर्मचारीवृंद मंजूर करणे.

या बाबीवर विस्तृत चर्चा होऊन अध्यक्षांनी असे सुचित केले की, प्रत्यक्षात योजना हस्तांतर करताना संबंधीत जिल्हापरिषदा त्या योजनेवरील कर्मचारी वृंदासह योजना स्विकारणेस इच्छुक नसतात हा आजपर्यंतचा अनुभव आहे. त्यामुळे या योजनेसाठी अतिरिक्त कर्मचारी वाढविणेपूर्वी जिल्हापरिषदेचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करुनच पुढील कार्यवाही करणे उचित होईल. असे सुचवित करुन या प्रकरणी नगरपालिकेसोबत बैठक लवकरच मंत्रालयीन स्तरावर आयोजित करण्याचे ठरवून मंडळाच्या पुढील सभेत या प्रकरणी निर्णय घेण्याचे ठरविले.

__कार्यक्रम बाब क्र.14__ :- मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष इ. यांचेसाठी मंजूर असलेल्या अतिथ्यासाठीची तरतूद वाढवणे.

कार्यक्रम बाब मंजूर करण्यांत येऊन कार्यक्रम बाबीतील अ.क्र.4 वरील प्रस्तावित सुधारित मर्यादा रु.3000 वरुन रु.6000 ने वाढवून देण्याचे ठरले. तथापी हा प्रस्ताव शासनाकडून मान्य करुन घ्यावा लागेल असे प्रधान सचिव, नगर विकास विभाग व काही सदस्य यांचे म्हणणे होते. शेवटी हा प्रस्ताव अंतिमत: मान्य करणे मंडळाच्या अखत्यारीत आहे किंवा शासनाची मान्यता आवश्यक आहे हे प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी तपासावे असे ठरले व खालीलप्रमाणे ठराव करण्यांत आला.

__ठराव :-__

असा ठराव करण्यांत येतो की, मंडळाच्या अध्यक्ष।उपाध्यक्ष व वरिष्ठ अधिका-यांना अतिथ्यासाठी महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ कायदा कलम क्र.15 (2)(आर) अन्वये दिलेल्या प्राधिकाराचा वापर करुन खालीलप्रमाणे अतिथ्यासाठी खर्च करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. या प्रस्तावास शासनाची मान्यता आवश्यक आहे काय हे प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी तपासावे.

| | कोणतेही एकावेळेस पावत्या सादर न करता | कोणतेही एकावेळेस पावत्या सादर करुन. | वार्षिक एकूण खर्चाची मर्यादा. |
|---|---|---|---|
| 1. अध्यक्ष. | रु. 75 ।- | रु.1000 ।- | रु.25000 ।- |
| 2. उपाध्यक्ष. | रु.75 ।- | रु. 750 ।- | रु. 20000 ।- |
| 3. सदस्य सचिव. | रु. 75 ।- | रु. 500 ।- | रु. 10000 ।- |
| 4. अ) मुख्य अभियंता.<br>ब) वि.स.मु.ले.अ. | रु. 50 ।- | रु. 350 ।- | रु. 6000 ।- |

(11)

**कार्यक्रम बाब क्र.15** : चिखलदरा येथे विश्रामधाम बांधण्याचा प्रस्ताव.

सदर कार्यक्रम बाब मंजूर करण्यांत आली. परंतु विश्रामधामासाठी लागणारा खर्च हा 15 लाखाच्या मर्यादेत राहील असे सुचविण्यांत येवून खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आला.

**ठराव :–**

चिखलदरा येथे मंडळाच्या मालकीचे अतिथीगृह (विश्रामधाम) रु. 15 लाखाच्या मर्यादेत बांधण्याचे व मंडळाच्या निधीतून हयासाठी खर्च करण्याचे अधिकार सदस्य सचिव आणि वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांना देण्यांत येत आहेत.

70 व्या सभेतील आयत्या ऐन वेळच्या कार्यक्रम बाबीमधील चर्चा न झालेल्या बाबी.

**टेबल बाब क्र.1** :– सुधारीत वाढी माथेरान (जि.रायगड) पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

सदर कार्यक्रम बाब मंजूर करण्यांत येवून खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आला.

**ठराव :–**

या ठरावाद्वारे, सुधारित माथेरान वाढीव पाणी पुरवठा योजना (किंमत रु. 226.63 लक्ष ढोबळ) महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ, मुंबई स्वीकृत करीत आहे. सुधारित योजनेस शासनाकडून मंजूरी मिळाल्यानंतर योजनेतील उर्वरित कामे पूर्ण करुन योजनेचे लेखे पूर्ण करण्यांत येतील. या आराखडयांत काहीही तरतूद नाही. तरी सन 1997–98 च्या मंडळाच्या कृती आराखडयांत रु. 14.94 लक्ष एवढी तरतूद करणेत यावी.

**टेबल बाब क्र2** :– सांगली शहरासाठी भुयारी गटार योजना टप्पा–2.

सदर कार्यक्रम बाबीबाबत विस्तृत चर्चा होऊन सभेत असा निर्णय घेण्यांत आला की, सांगली नगरपालिकेचे मिरजसह महानगरपालिकेत रुपांतर झाल्यानंतर या विषयावर पुढील कार्यवाही करावी, व त्यानंतरच ही कार्यक्रम बाब मंडळाचे पूढील बैठकीत ठेवण्यांत यावी.

**टेबल बाब क्र3** :– कंत्राटदारांच्या नोंदणीचे नियम सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्यांना सवलती.

सदर बाब विस्तृतपणे मंडळाचे अधीक्षक अभियंता (मुख्यालय) यांनी सभेत विषद केली. बेरोजगार अभियंत्यांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने कंत्राटदारांच्या नोंदणीचे जे नियम तयार केले आहेत त्यामुळे बेकार अभियंत्यांच्या रोजगाराचा प्रश्न सुटण्यास मोठया प्रमाणावर मदत होईल. बाबीत उल्लेखिलेली, किमान अनूभवाची अट घालू नसे. मात्र हयावर एक वर्षानंतर विचार करण्यांत यावा असे ठरले. व खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यांत आला.

(12)

ठराव :-

असा ठराव करण्यांत येतो की, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि. 2 फेब्रुवारी, 1996, व 17 डिसेंबर, 1996 च्या निर्णयाद्वारे सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्यांना देय असलेल्या सवलती शासन निर्णयात अंतर्भूत असलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून तसेच किमान अनुभवाची अट शिथील करुन महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळात कंत्राटदार म्हणून काम करु इच्छिणा-या सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्यांना द्याव्यात.

**टेबल बाब क्र.4** :- निविदांना काही जिल्हयातून प्रतिसाद मिळत नसल्याने नोंदणीकृत ठेकेदारांची संख्या वाढविणेबाबत.

कार्यक्रम बाब मंजूर करण्यांत आली व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आला.

ठराव :-

1. हयापुढे नळ पाणी पुरवठा योजनांच्या निविदा काढताना निविदेच्या किंमतीतून पाईपांची किंमत वजा करुन येणा-या किंमतीवर ठेकेदाराचा वर्ग ठरविण्यांत यावा मात्र पाईप्सच्या किंमतीसह जी निविदेची किंमत येते त्या किंमतीसाठी आवश्यक असलेली इसारा रक्कम, सुरक्षा अनामत इत्यादी ठेकेदाराने देणे आवश्यक राहील. तसेच निविदा विक्री करण्यापूर्वीच ठेकेदाराकडून पाईपांच्या किंमतीसह येणा-या कामाच्या किंमतीनुसार येणा-या ठेकेदाराच्या नोंदणीवर्गासाठी आवश्यक असलेली बँक सॉल्व्हन्सीची रक्कम आणि प्रत्यक्षात ठेकेदाराच्या वर्गानुसार देण्यांत आलेलया बँक सॉल्व्हन्सीची रक्कम यातील फरकायेवढया रकमेची जादा बँक सॉल्व्हन्सी देणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

2. नोंदणीकृत ठेकेदारांची संख्या वृत्तपत्र जाहिरातीद्वारे वाढवावी तसेच इतर खात्यातून प्रसिध्दी द्यावी.

**टेबल बाब क्र.5 व सुधारित टेबल बाब क्र.14** :- सिमेंटचा पुरवठा करणेसाठी दर करार करणे.(पाटबंधारे खात्याच्या धर्तीवर).

या बाबींवर सभेमध्ये सविस्तर चर्चा झाल्यानंतर असे ठरविण्यांत आले की, पाटबंधारे खात्याला ज्या दराने सिमेंट पुरविण्यांत येते तोच दर मंडळासाठी ठेवावा. यात रेल्वेने किंवा ट्रकने करण्यांत येणा-या पुरवठयाचा दर सारखाच राहील हे पहावे व या अटीच्या अधीन राहून सिमेंट पुरवठयाचा दर करार करण्यास सभा मान्यता देत आहे व त्यानुषंगाने खालीलप्रमाणे ठराव करण्यांत येत आहे.

ठराव :-

सध्या पाटबंधारे विभाग ज्या अटी व शर्तीवर ए.सी.सी.एल.ॲन्ड टी, सी.सी.आय, नर्मदा सिमेंट व माणिकगड सिमेंट हया उत्पादकांकडून रु. 1940।- प्रती टन हया मूळ दरावर सिमेंट घेणे तयाच अटी, शर्ती व दरांवर सर्व पाणी साठवणा-या बांधकामासाठीचे सिमेंट एल ॲन्ड टी कडून व इतर बांधकामासाठीचे सिमेंट खाली दर्शविल्याप्रमाणे सर्वात जवळ फॅक्टरी असलेल्या उत्पादकांकडून प्राप्त करुन घेण्यास परवानगी देण्यांत येत आहे. ए.सी.प्री. व सी.सी.आय.ची 100 टक्के आगाऊ रक्कम भरण्याची शर्त (निधी उपलब्ध असल्यास) मंजूर करण्यात येत आहे. तसेच नर्मदा सिमेंटचा पाटबंधारे खात्याने मान्य केलेला वाहतूक खर्चासहच्या दरास 13 टक्के विक्री करासह मान्यता देण्यांत येत आहे.

1. सांगली, पुणे, नवी मुंबई, ठाणे 1 व 2 ह्या मंडळासाठी नर्मदा सिमेंटच्या रत्नागिरी वर्क्स मधून.
2. अकोला व नागपूर मंडळासाठी पाणी साठवण उपांगे तसेच इतर सर्व बांधकामासाठीसुध्दा एल.ॲन्ड टीच्या आवारपूर वर्क्स व सी.सी.आय.च्या चांदा वर्क्समधून.
3. जळगांव मंडळासाठी नर्मदा सिमेंटच्या मगदाला वर्क्स व एल.ॲन्ड टीच्या आवारपूर वर्क्समधून.
4. औरंगाबाद, नांदेड मंडळासाठी सी.सी.आयच्या आदिलाबाद वर्क्समधून.

प्रादेशिक मुख्य अभियंत्यांना वरीलप्रमाणे त्यांचे कार्यक्षेत्रातील मंडळासाठी सिमेंटचे पुरवठा आदेश देण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

<u>टेबल बाब क्र.6</u> :– पाणी पुरवठा योजना कार्यरत असलेल्या कर्मचा–यांना वाहनसुविधा किंवा भत्ता मंजूर करणेबाबत.

या बाबींवर सभेत चर्चा होऊन असे स्पष्ट करण्यांत आले की, शहरापासून साधारणपणे आठ (8) किलोमिटरच्या आत असलेल्या योजनांचे ठिकाणी काम करावे लागलयास अशा प्रकारचा भत्ता देता येणार नाही. परंतु त्यापेक्षा जास्त अंतरावरील योजनांच्या संदर्भात अशा प्रकरणी एम.आय.डी.सी.मध्ये काय पध्दत आहे, त्याचा अभ्यास करुन व अशा प्रकारच्या खर्चास मान्यता द्यावयाची ठरल्यास मंडळावर किती बोजा पडेल याबाबत संपूर्ण आकडेवारीसह प्रस्ताव तयार करुन ही बाब फिरवून (By Circulation) मान्य करुन घ्यावी असा सभेत निर्णय घेण्यांत आला.

<u>टेबल बाब क्र.7</u> :– मोरबे धरण, ता.खालापूर, जि.रायगड चे बांधकामासंबंधात कंत्राटदार श्री.आर.एम.मोहिते आणि कंपनी, कोल्हापूर यांच्या मागण्या व उपलब्ध अतिरिक्त जलनिष्पत्ती पूर्णपणे साठविण्यासाठी मोरबे धरणाची उंची 5 मिटरने वाढविण्याचा प्रस्ताव.

सदर बाब मंडळाच्या दि. 22.1.97 च्या बैठकीत ठेवण्यांत यावी असे ठरले.

<u>टेबल बाब क्र.8</u> :– म.पा.पु व ज.नि.मंडळ –यांत्रिकी संवर्गाचे बळकटीकरण.

बाब पुढील बैठकीत ठेवण्याच्या सुचना मा.अध्यक्षांनी दिल्यामुळे ही बाब पुढील सभेत ठेवण्यांत येत आहे.

<u>टेबल बाब क्र.10</u> :– म.पा.पु व ज.नि.मंडळामधील कार्यकारी अभियंता (स्था.) व उप अभियंता (स्था.) यांच्या सेवाभरती नियमांना मान्यता देणेबाबत.

कार्यक्रम बाब मान्य करण्यांत आली व पुढीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला आहे.

<u>ठराव :–</u>

म.पा.पु व ज.नि.मंडळामधील महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा वर्ग–1 व वर्ग–2 मधील कार्यकारी अभियंता, उप अभियंता सेवा प्रवेश नियम 1997 म्हणून सोबत जोडलेल्या सेवा प्रवेश नियमास मंडळ या ठरावाद्वारे मान्यता देत आहे.

(14)

शासनाकडून वरील सुधारित सेवा प्रवेश नियमांना मान्यता मिळविण्यासाठी पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याचे अधिकार मंडळाचे सदस्य सचिव यांना देण्यांत मंडळ संमती देत आहे.

**टेबल बाब क्र.11** :– अमरावती पाणी पुरवठा योजना – रेवसा पाणी पुरवठा केंद्र बंद न करता योजनेवरील यंत्रसामग्री व इतर साहित्याचा पर्यायी उपयोग करणेबाबत.

या योजनेंतर्गत 25 गावांना पाणी पुरवठा करण्याचे चालू ठेवावे व उर्वरित 15 योजनांवरील यंत्रसामग्रीची विक्री करकावी किंवा ती इतरत्र उपयोगात आणावी असे ठरविण्यांत आले. म्हणून खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आला आहे.

ठराव :–

अमरावती शहरासाठी उर्ध्व वर्धा धरणातून पाणी पुरवठा योजना एप्रिल 1994 पासून कार्यान्वित करण्यांत आली असून अमरावती शहरास नियमित पाणी पुरवठा सुरु आहे. रेवसा पाणी पुरवठा केंद्रातून अमरावती शहरासाठी पाणी पुरवठा घेण्याचे बंद केले आहे. रेवसा पाणी पुरवठा केंद्रावरील यंत्रसामग्री, पाईपलाईन, कुपनलिका व इतर साहित्याच्या आवश्यकतेनुसार इतर पाणी पुरवठा योजनांसाठी उपयोग होणार असल्याने रेवसा पाणी पुरवठा केंद्राचा वापर अमरावती शहरासाठी बंद करण्याच्या प्रस्तावाला मान्यता देण्यांत येत आहे. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी सर्व अधिकार मंडळाचे सदस्य सचिव यांना देण्यांत यावेत.

**टेबल बाब क्र.12** :– ग्रामीण पाणी पुरवठा योजनांवर योजनांतर्गत लागणारे सी.आय. व डी.आय. पाईप्स मंडळामार्फत पुरविण्याबाबत.

बाब मान्य करण्यांत येवून खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आला.

ठराव :–

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी सर्व कामांची एकत्रित एकच निविदा काढताना सी.आय. व डी.आय. पाईप्सचे खुल्या बाजारातील दर आणि दर करारातील फरकामधील उद्‌भवणा–या जादा अवाजवी खर्चाबाबत शासनास अवगत करुन शासनाच्या मूळ आदेशाचा पुनर्विचार करुन ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी देखील नागरी पाणी पुरवठा योजनांप्रमाणेच सी.आय. व डी.आय. पाईप्स मंडळाने खरेदी करुन ते ठेकदारास पुरविण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे अधिकार मंडळाचे सदस्य सचिवांना देण्यांत येत आहेत.

**टेबल बाब क्र.13** :– कोल्हापूर (शहर) वाढीव तथा पाणी पुरवठा सुधार योजना टप्पा–1, भाग–1. 350 मि.मि.ते 1100 मि.मि.व्यासाच्या गुरुत्व वाहिनीकरीता प्रिस्ट्रेस्ड कॉंक्रीट पाईप्सचे संकल्पन करुन उत्पादन करणे, पुरवठा करणे, टाकणे, जोडणे, व समाधानकारक चाचणी देणे.

कार्यक्रम बाब मान्य करण्यांत येवून खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आला.

(15)

ठराव :-

रु.6.31.86.577.00 (रु.सहा कोटी एकतीस लाख श्याऐंशी हजार पाचशे सत्याहत्तर फक्त)किंमतीची मे.ॲक्वा प्रिस्ट्रेस्ड प्रॉडक्टस् प्रा.लि., पुणे यांची कमीत कमी किंमतीची( अंदाजपत्रकापेक्षा 10.80 टक्के कमी दराची) प्रतिसादात्मक व तांत्रिकदृष्टया योग्य असलेली निविदा स्विकारण्यास मंडळ मान्यता देत आहे. या प्रकरणी पुढील आवश्यक कार्यवाही करण्यास मंडळाच्या सदस्य सचिवांना प्राधीकृत करण्यांत येत आहे.

टेबल बाब क्र. 14 :- टेबल बाब क्र.5 पहावी.

टेबल बाब क्र.15 :- 1996-97 वित्तीय वर्षात खुल्या बाजारातील शासकीय कर्ज उभारणी.

सदर बाब मंडळाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी विषद केली त्यावर उहापोह चर्चा होऊन ती मान्य करण्यांत आली व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आला.

ठराव :-

असा ठराव करण्यांत येतो की, मंडळाचे सदस्य सचिव।वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांना नागरी पाणी पुरवठा व जलनि:सारण योजनांसाठी सन 1996-97 मध्ये शासनाकडून उभारण्यांत आलेले खुल्या बाजारातील कर्ज रु.43.43.00.000।- (रु.त्रेचाळीस कोटी त्रेचाळीस लक्ष फक्त) शासनाचे सुधारित अटी व शर्तीस अधीन राहून शासनाकडून प्राप्त करुन घेण्यास मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.

दिनांक २२.५.९८ रोजी झालेल्या सभेचे

इतिवृत्त

70 वी सभा

(16)

**दि. 22 जानेवारी 1997 रोजीची मंडळाची 70 वी बैठक.**

मंडळाच्या 70 व्या सभेतील उर्वरीत कार्यक्रम बाबींसाठी बुधवार दिनांक 22.1.1997 रोजी दुपारी 12.00 वाजता आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या 70 व्या सभेतील उर्वरित कार्यक्रम बाबींवर मंडळाची सभा बुधवार दिनांक 22.1.1997 रोजी दुपारी 12.00 वाजता मंडळाचे अध्यक्ष तथा मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे दालनांत मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

सदरहू सभेस सोबत जोडलेल्या परिशिष्ट-क मध्ये दर्शविलेले सदस्य उपस्थिती होते.

मंडळाचे सदस्य सचिव श्री.राजेंद्र सगणे यांनी प्रथम मा.श्री.अण्णासाहेब डांगे, अध्यक्ष, म.पा.पु. व ज.नि.मंडळ व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन सभेस सुरवात करण्याची सभागृहाची अनुमती घेतली व त्यानंतर सभेपुढील विषय वाचण्यास सुरवात केली.

**मागील सभेतील उर्वरित बाबी.**

**बाब क्र.12 :– टंकलेखक म्हणून दिलेला विकल्प स्विकारणे.**

या बाबीवर दि.15.1.97 च्या सभेत मा.उपाध्यक्षांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे सविस्तर माहितीसह कार्यक्रम बाब सभेपूढे ठेवण्यांत आली. याबाबत मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी सभागृहात सादर केलेल्या विवरणपत्रानुसार विवरण पत्रातील अ.क्र. मधील टंकलेखिका श्रीमती पाटणकर, कनिष्ठ लिपीक यांनी त्यांचा कायमस्वरुपी टंकलेखक म्हणून राहण्याचा व त्यासाठी शासनाने मान्य केलेली वेतनश्रेणी स्विकारण्याचा विकल्प वेळेत सादर केला असल्यामुळे त्यांचा प्रस्ताव शासनास पाठविण्याची आवश्यकता नसल्याचे प्रधान सचिवांनी सुचविले. तथापि श्रीमती पाटणकर, क.लि. यांनी त्यांचा कायमस्वरुपी टंकलेखकाची वेतनश्रेणी स्किारण्याचा विकल्प वेळेत दिला असला तरी संबंधित विभागाने त्यांच्या विकल्पावर वेळीच कारवाई केलेली नाही व आज या प्रकरणास फारच विलंब झाला असल्याने इतर कर्मचा–यांचे प्रस्तावाबरोबर त्यांचाही प्रस्ताव शासनास सादर करणे आवयक असल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर ही कार्यक्रम बाब सर्वानुमते मान्य करण्यांत येवून खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आला.

तसेच शासकीय निर्णय उशीरा प्राप्त होणे किंवा न प्राप्त होणे ही बाब टाळण्यासाठी सर्व शासकीय खात्यांना पत्र लिहून मंडळाचे नाव मेलींग लिस्टमध्ये समाविष्ट करण्यास विनंती करावी.

ठराव :–

ठराव करण्यांत येतो की, ज्या कर्मचा–यांनी लिपीक संवर्गातील बढतीची संधी सोडून देण्याचे लिहून दिले आहे व टंकलेखकाचा संवर्ग कायमस्परुपी स्विकारला आहे अशा कर्मचा–यांनी, दिनांक 24.7.86 चा शासन निर्णय त्यांच्या नजरेस न आल्याने, विकल्प उशीरा दिला आहे अशा कर्मचा–यांचा विकल्प एक विशेष बाब म्हणून मान्य करुन त्यानुसार त्यांची वेतननिश्चिती करण्यांत यावी. या बाबीस शासनाची मान्यता मिळविण्याचे अधिकार मंडळाचे सदस्य सचिव यांना देण्यांत येत आहेत.

बाब क्र.13 :– अहमदनगर येथील विळद वाढीव पा.पु. योजनेसाठी कर्मचारीवृंद मंजूर करणे.

योजना चालविण्यासाठी आवश्यक असलेली एकूण 14 पदे (पंपचालक, मेस्त्री, फिटर इत्यादी) निर्माण करुन ती भरणे आवश्यक असल्याचे सभेचे मत झाले. तथापि योजना हस्तांतर करताना, त्या योजनेवरील कर्मचारी वर्गासह योजना स्विकारण्यास संबंधित जिल्हापरिषदा, नगरपालिका इत्यादी असहमत असतात. त्यामुळे कर्मचा–यांशिवाय योजना हस्तांतर करुन अतिरिक्त कर्मचा–यांना मंडळात ठेवून घेणे भाग पडते. म्हणून वरीलप्रमाणे पदे भरण्यापूर्वी ती भरणे कसे आवश्यक आहे ही बाब संबंधीत नगरपालिकेच्या अधिका–यांशी ताबडतोब चर्चा करुन निदर्शनास आणून द्यावी व जर त्यांनी होकार दर्शविला तरच पदे भरण्याची कारवाई व्हावी. अन्यथा आहे त्याच कर्मचा–यांमध्ये योजन जून. 97 पर्यंत चालू ठेवावी. असे ठरविण्यांत आले. तसेच ही योजना 1.6.97 पासून कर्मचा–यांसह हस्तांतरित करण्यासाठी तांतडीने पावले टाकण्याचे ठरले.

बाब क्र.7 :– मोरबे धरण, ता.खालापूर, जि.रायगडचे बांधकाम.

विषय : मोरबे धरण ता.खालापूर, जि.रायगडचे बांधकामासंबंधात कंत्राटदार श्री.आर.एम. मोहिते आणि कंपनी, कोल्हापूर या च्या मागण्या व उपलब्ध अतिरिक्त जलनिष्पत्ती पूर्णपणे साठविण्यासाठी मोरबे धरणाची उंची 5 मीटरने वाढविण्याचा प्रस्ताव – याबाबतची कार्यक्रम बाब क्र.7.

कार्यक्रम बाब क्र.7 ही बाब टेबल आयटेम म्हणून महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या दिनांक 2.1.1997 रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यक्रम पत्रिकेवर ठेवण्यांत आली होती. बैठकीमध्ये मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी या बाबीसंबंधात सविस्तर माहिती सांगितली. परंतु वेळेअभावी या बाबीवर चर्चा होऊ शकली नाही.

त्यानंतर महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाच्या दिनांक 15.01.97 रोजी झालेल्या बैठकीला मुख्य अभियंता (प्रकल्प) उपस्थित राहू न शकल्यामुळे या विषयावर पुढील बैठकीत चर्चा करावी असे ठरले. त्यानंतर दि. 22.1.97 रोजी झालेल्या मंडळाच्या सभेत या बाबीसंबंधात सविस्तर चर्चा करण्यांत आली. सुरुवातीला मुख्य अभियंता (प्रकल्प) यांनी प्रकल्पाची सद्यस्थिती, कंत्राटदारांच्या मागण्या तसेच मोरबे धरणाची उंची वाढविण्याचा प्रस्ताव या संदर्भात पार्श्वभूमी विषद केली. त्यानंतर कंत्राटदारांच्या मागण्या, समितीने केलेले विश्लेषण व शिफारशी यावर सविस्तर चर्चा झाली व मागणीनिहाय पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यांत आले.

मागणी क्र.1 :– यंत्रसामुग्री अग्रिमावरील व्याज माफ करणे.

माती कामाच्या अपेक्षित प्रगतीच्या 25 टक्के इतकी प्रगती न झाल्याने फेब्रुवारी 1992 पर्यंतच्या कालावधीसाठी यंत्रसामुग्री अग्रिमावरील व्याज माफ करण्यांत यावे अशी कंत्राटदारांची मागणी आहे. यासंबंधी ' निविदेमध्ये दिलेला कामाचा कार्यक्रम व त्या मुदतीत प्रत्यक्षात करण्यांत आलेले काम बघता माती कामाच्या 25 टक्के इतकी प्रगती 11/91 अखेरपर्यंत साधता आली असे दिसते. वरील परिस्थितीत यंत्रसामुग्री अग्रिमावरील व्याज 11/91 अखेरपर्यंतच्या कालावधीसाठी माफ करणे योग्य होईल ' ही समितीची शिफारस मान्य करण्याचा निर्णय घेण्यांत आला. घसारा किंमतीवर ( Amount of Depreciation) आयकर विभाग सूट

देतो. त्यामुळे कंत्राटदारांना दुहेरी फायदा दिला जाणार नाही हे तपासून पहावे अशी. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी सूचना केली होती. त्यानुसार तपासणी केल्यावर असे आढळून आले की, यंत्रसामुग्रीच्या घसा–याच्या किंमती इतकी तरतूद रिटर्नमध्ये दाखविता येते व त्यावर आयकर आकारला जात नाही. या पलिकडे कोणतीही विशेष सूट आयकर विभागाकडून दिली जात नाही. त्यामुळे ठेकेदारास या बाबीपोटी दुहेरी फायदा मिळण्याची शक्यता नाही. शिवाय काम चालू नसेल त्यावेळी घसा–याची तरतूद ही कंत्राटदाराच्या तोटयाचाच भाग होतो. त्यासाठी काम बंद असलेल्या कालावधीसाठी निविदेतील विशेष तरतूद क्र.12.51 अन्वये यंत्रसामुग्री अग्रिमावरील व्याज माफ करण्याचा प्रस्ताव योग्य आहे. अशाच प्रकारची कार्यवाही पाटबंधारे विभागाकडूनही तिलारी, हेटवणे इत्यादी प्रकल्पांकरिता करण्यांत आली आहे.

**मागणी क्र.2 :– काम बंद असलेल्या कालावधीत दि.4.10.1989 ते 21.11.1990 मध्ये (410 दिवस) सोसाव्या लागलेल्या अवांतर नुकसानीची (Pecuniary losses) भरपाई करण्याची कंत्राटदारांची मागणी :–**

प्रथमत: 410 दिवस काम बंद ठेवावे लागले तरी यापैकी साप्ताहिक सुट्या, पगारी सुट्या (Paid Holiday) व निविदेतील अट क्र.15.3 नुसार 30 दिवसांचा (Initial period) कालावधी वजा करणे आवश्यक असल्यामुळे बाधीत कालावधी (closure period) 213 दिवस धरावा अशी समितीने शिफारस केली आहे. ती मान्य करण्यांत आली. त्यानंतर कंत्राटदारांच्या बाबवार मागण्या व त्यावरील समितीच्या शिफारशी यांचा विचार करण्यांत आला व पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यांत आला.

(1) काम बंद असण्याच्या कालावधीत (closure period) यंत्रसांमुग्री विनाकाम राहिल्याबद्दल कंत्राटदारांना घसा–याची रक्कम (Amount of Depreciation) नुकसान भरपाईपोटी देण्यांत यावी यास मान्यता देण्यांत आली.

(2) काम बंद असण्याच्या कालावधीत कंत्राटदारांनी अत्यंत आवश्यक इतकेच कुशल व अकुशल कामगार कामावर ठेवले होते. त्यांच्या वेतनापोटी कंत्राटदारांना. शासनाने संबंधित कालावधीसाठी जाहीर केलेल्या कमीत कमी दराने देय होणारी रक्कम नुकसान भरपाईपोटी देण्यांत यावी यास मान्यता देण्यांत आली.

(3) ब–याच कालावधीसाठी काम बंद असल्यामुळे, काम सुरु करण्याअगोदर कंत्राटदाराला त्याने कामावर आणलेल्या यंत्रसामुग्रीचे इंजिन ऑईल, गिअर ऑईल व बॅट–या बदलण्यासाठी आलेल्या खर्चाइतकी रक्कम ( cost of one time replacement) नुकसान भरपाईपोटी अदा करण्यास मान्यता देण्यांत आली.

(4) कंत्राटदारांच्या इतर अवांतर नुकसान भरपाईच्या मागण्या अमान्य करण्यांत आल्या व काम बंद असणा–या कालावधीत कंत्राटदारांना सोसाव्या लागलेल्या अवांतर नुकसानीपोटी (pecuniary losses) कंत्राटदारांना एकत्रितपणे रु. 1.10 कोटी इतकी नुकसान भरपाई देण्यांत यावी असा निर्णय घेण्यांत आला.

**मागणी क्र.3 :– वाळूच्या किंमतीतील फरक अदा करण्याबाबत.**

या संबंधात समितीने केलेल्या शिफारशीनुसार

(1) स्विकृत निविदेतील परिशिष्ट 'ब' मध्ये अंतर्भूत असलेल्या वाळूच्या गाळणीचे (Inclined sand filter) कामासाठी आणलेल्या वाळूच्या दरातील फरक अदा करण्याबाबत विचार करता येणार नाही.

(2) वाळूच्या गाळणीच्या स्विकृत निविदेच्या परिशिष्ट 'ब' मध्ये अंतर्भूत नसलेल्या बाबीकरता (**Horizontal sand filter**) आणलेल्या वाळूच्या दरातील फरक अतिरिक्त दरसूचीवर अदा करण्यास मान्यता देण्यांत आली.

<u>मागणी क्र.4 :– दरात सुधारणा करण्याच्या मागणीबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यांत आला.</u>

(1) स्विकृत निविदेची मूळ मुदत संपल्यानंतर म्हणजे 4.10.95 नंतर केलेल्या व करावयाच्या कामासाठी समितीने सुचविलेल्या बाबवार सुधारित दराने कंत्राटदारांना कामाची किंमत अदा करण्यास मान्यता देण्यांत आली. सुधारित दर 5.10.95 पासून One Time Rate म्हणून अंमलात येतील. कंत्राटदारांची मूळ बोली ही 1.90 टक्के कमी दराची असल्यामुळे सुधारित दरातून 1.90 टक्के इतकी रक्कम वजा करण्यांस व स्विकृत निविदेच्या परिशिष्ट 'अ' मध्ये दर्शविलेल्या बांधकाम साहित्याच्या महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाने केलेल्या पुरवठयाकरिता स्विकृत निविदेच्या परिशिष्ट 'अ' मध्ये दर्शविलेल्या दरानेच कंत्राटदारांकडून पैसे वसूल करण्यास मान्यता देण्यांत आली.

वरीलप्रमाणे निर्णय घेण्यांत आला असला तरी काम सुरु करण्यास झालेला 410 दिवसांचा विलंब लक्षात घेऊन, कंत्राटदारांनी स्वीकृत विनिदेच्या मुदतीत किती काम करणे आवश्यक होते व ते किती काम करु शकले हे तपासावे व कंत्राटदारांच्या चुकीमुळे जितके काम कमी झाले आहे तितके पूर्ण केल्यानंतरच्या दिनांकापासून कंत्राटदारांना सुधारित दर देणे योग्य होईल. त्यादृष्टीने परिस्थिती पडताळून पहावी व यासंबंधी एक टिप्पणी सादर करावी अशी मा.अध्यक्षांनी सूचना केली. याप्रमाणे वस्तुस्थितीचा आढावा घेऊन टिप्पणी सादर केली आहे. कंत्राटदारांनी प्रत्यक्षात करता येण्यासारखे सर्व काम केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे सुधारित दर 5.10.95 पासून लागू करण्याच्या निर्णयात काही बदल करण्याची आवश्यकता दिसत नाही.

(2) भाववाढीपोटी कंत्राटदारांना अदा करावयाची रक्कम ही 5.10.95 पासून सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रसारित केलेला शासन ठराव क्र.बीओजी–1091/सीआर–172/बीएलडीजीएस–2, दिनांक 10.1.92 मधील सुत्रांप्रमाणे काढण्यांत यावी. यासाठी दि. 5.10.95 रोजीचा **Price Index** हा **Basic price index Io** म्हणून धरण्यांत यावा. शासनाच्या वरील ठरावामधील तरतूदी या स्विकृत निविदेतील भाववाढी संबंधीचे कलम क्र.60 मधील तरतूदींना (**Supercede**) करतील. शासन ठराव दिनांक 10.1.92 मधील सुत्रांनुसार भाववाढ काढण्यासाठी मजुरी, बांधकाम साहित्य व पेट्रोल, ऑईल, ल्युब्रीकंट (**POL**) यांची टक्केवारी स्विकृत निविदेतील कलम क्र.60 मध्ये दिल्याप्रमाणेच धरण्यांत यावी असा निर्णय घेण्यांत आला. अतिक्रमित

(3) ज्या बाबींच्या बाबतीत दर सुधारित करण्यांत आलेले नाहीत अशा बाबींसाठी भाववाढ शासनाच्या वर दिलेला ठराव दिनांक 10.1.1992 मधील सुत्रांप्रमाणेच काढण्यांत यावी. यासाठी सध्याची निविदा स्विकृतीसाठी जाहीर केलेल्या शेवटच्या दिनांकाला जो प्राईस इंडेक्स असेल तो बेसिक प्राईस इंडेक्स **Io** म्हणून धरण्यांत यावा, असा निर्णय घेण्यांत आला.

20

मागणी क्र.5 :– मोरबे धरणाची उंची वाढविण्याचा प्रस्ताव :–

धरणस्थळी उपलब्ध असलेल्या जास्तीच्या जलनिष्पत्तीचा साठा करण्यासाठी मोरबे धरणाची उंची 5 मीटरने वाढविण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यांत आली व हे काम सध्याच्याच निविदेवर कंत्राटदारांकडून वरीलप्रमाणे सुधारित दर + भाववाढ दराने करुन घ्यावे असे ठरले.

धरणाची उंची वाढविण्याचे प्रत्यक्ष काम त्या प्रकल्पाचे मुख्य लाभधारक सिडको यांनी मंजूरी दिल्यानंतरच हाती घेण्यात यावे. तथापी धरणामध्ये पाण्याचा साठा 1999 मध्ये करावयाचे नियोजन असल्यामुळे धरणाच्या पाण्याकडील बाजूचे 88.00 मीटर तलांकापर्यंतचे करावे लागणारे अतिरिक्त मातीकाम (धरणाची उंची वाढविण्यासाठी काटछेदाप्रमाणे)(Obligatory casing embankment) तसेच अश्मपटल (pitching) व अश्मपदाग्र (Rock-Toe) ही कामे सिडकोच्या मंजुरीसाठी न थांबता सध्याच्याच कंत्राटदारांकडून सध्याच्याच निविदेवर वरीलप्रमाणे सुधारित दर + भाववाढ या दराने करुन घ्यावीत. असा निर्णय घेण्यांत आला.

वरीलपैकी मागणी क्र.1 व मागणी क्र.4 बाबत मा.अध्यक्षांकडे सविस्तर विश्लेषण सादर करुन त्यास त्यांनी मान्यता मिळाल्यासच त्यास मंडळाची मंजुरी आहे असे समजावे असे ठरले. उर्वरित मागण्यांबाबत मंडळाने मंजुरी सभेतच दिली आहे असे समजावे.

बाब क्र.8 :– म.पा.पु व ज.नि.मंडळात यांत्रिकी संवर्गाचे बळकटीकरण.

मंडळाने पुन्हा एकदा या बाबीवर विचार करुन या पदाची आवश्यकता आहे किंवा कसे हे पाहून नंतरच ही बाब मंडळाच्या पुढील सभेत ठेवावी अशा सूचना देण्यांत आल्या.

आयत्यावेळचे प्रश्न :

टेबल बाब क्र.1 :– म.पा.पु व ज.नि.मंडळात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांचा नवीन संवर्ग निर्माण करणेबाबत.

वरील नवीन संवर्गाची एकूण 600 पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव यापूर्वीच शासनाकडे व पुढे मंत्रिमंडळाकडे पाठविण्यांत आला आहे. त्यावर थोडयाच कालावधीत. यापैकी 286 पदांसाठी शासनाची मंजूरी मिळणार आहे असे प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी सांगितले व त्यामुळे आताची या पदांची सुधारित बाब अधिक पदे प्राधिकरणाच्या अधिकाराने निर्माण करावयाची असल्यामुळे या प्रस्तावाचा विचार करता येत नाही असे ठरवून मंडळाने सदर सुधारित बाब फेटाळली.

(गोपनीय) टेबल बाब क्र2 :– ब्रिटीश शासन अर्थसहाय्यीत (ओडिसे)—निविदा.

या बाबीवर सर्व बाजूंनी विचार होऊन कार्यक्रम बाब मंजूर करण्यांत आली व खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला.

21

ठराव :–

ब्रिटीश शासन अर्थसहाय्यीत (ओडिअे प्रकल्प) जळगांव जिल्हयातील 51 खेडयांच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील कलाली उद्‌भव व उर्वरित कामांच्याकरिता मुख्य अभियंता (जा.बॅंक) ठाणे यांचेकडे प्राप्त झालेली सर्वात कमी खर्चाची म्हणजेच रु.5,30,16,120।– किंमतीची मे.एम.के.कोटेचा कंत्राटदार, यांच्या निविदा स्विकृतीस मंडळाची मंजूरी देणेंत येते. सदस्य सचिवांना ही निविदा ओडिअेकडून मान्यता घेऊन स्विकृती देण्याचे अधिकारही या ठरावान्वये देणेत येत आहेत.

टेबल बाब क्र.3 :– मंडळाचा 1995–96 चा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल.

मंडळाचा 1995–96 च्या वार्षिक लेख्यावर विस्तृत चर्चा होऊन लेख्यास मान्यता देण्यांत आली.

टेबल बाब क्र.4 :– औरंगाबाद येथे प्रशासकीय इमारत बांधणेबाबत.

या कामासाठी शासनाकडून पैसे मिळत नसल्यामुळे मंडळाला ते काम करावयाचे झाल्यास त्यासाठी होणारा खर्च मंडळाला मिळत असलेल्या इ.टी.पी. चार्जेस मधूनच करावा लागेल. तेव्हा मंडळासमोर ठेवण्यांत आलेल्या प्रस्तावानुसार या बिल्डींगचे (कार्यालयाच्या) बांधकाम इ.टी.पी. चार्जेसमधून करण्याचा मंडळाचा प्रस्ताव मान्य करण्यांत येत असून याबाबत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत येत आहे.

ठराव :–

गारखेडा, औरंगाबाद येथील मंडळाचे मालकीच्या जागेमध्ये 3726.50 वर्गमिटर एकूण बांधकाम असलेल्या रु. 2.00 कोटीच्या आंत प्रशासकीय इमारत बांधण्यास व या कामासाठीचा खर्च, मंडळास मिळणा–या इ.टी.पी. चार्जेस मधून भागविण्यास परवानगी देण्यांत येत आहे.

22

सदस्यांच्या उपस्थितीचे परिशिष्ट -अ

## परिशिष्ट – 'अ'

गुरुवार दिनांक 2.1.97 रोजी सकाळी 9. 30 वाजता मंडळाची 70वी सभा मंडळाचे अध्यक्ष तथा मा.मंत्री. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा.ना.श्री.अण्णासाहेब डांगे,
   अध्यक्ष,
   म.पा.पु.व ज.नि. मंडळ, व
   मंत्री. पा.पु.व स्व. विभाग.
   मंत्रालय, मुंबई.
2. मा.श्री.रविंद्र माने.
   उपाध्यक्ष,
   म.पा.पु.व ज.नि मंडळ व
   राज्यमंत्री नगरविकास तथा
   पा..पु.व स्व.विभाग. मंत्रालय.
   मुंबई.
3. श्री.व्ही.रंगनाथन.
   सदस्य,
   म.पा.पु.व ज.नि. मंडळ व
   प्रधान सचिव, पा.पु.व स्व.वि.
   मंत्रालय. मुंबई.
4. श्री.सी.सी.त्रिपाठी.
   सदस्य,
   म.पा.पु.व ज.नि. मंडळ व
   प्रधान सचिव, वित्त विभाग यांचे प्रतिनिधी.
5. श्री. राजेंद्र सगणे.
   सदस्य सचिव,
   म.पा.पु.व ज.नि.मंडळ.

खालिल अधिकारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

1. श्री.शे.दौ. अरमाळ, मुख्य अभियंता ( प्रकल्प )
2. श्री.वि.के. भसाळे, मुख्य अभियंता ( नागरी )
3. श्री. श.वि. शेळकीकर, मुख्य अभियंता ( ग्रामीण )
4. श्री. सु.का. पाटील, मुख्य अभियंता ( जा.बँक )
5. श्री.ज.बा.आंबेगावकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी.
6. श्री. अ.ना. अळवणी, अधीक्षक अभियंता ( मनिसंवसं )
7. श्री.मा.वि. दोमकोंडवार, अधीक्षक अभियंता ( मुख्यालय )
8. श्री.बा.स. पाटील, उप मुख्य लेखाअधिकारी.

बुधवार दिनांक [illegible] जानेवारी, 97 रोजी दुपारी 2.00 वाजता मंडळाची 70वी सभा मंडळाचे अध्यक्ष तथा मा.मंत्री. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा. ना.श्री. अण्णासाहेब डांगे,
   अध्यक्ष, म.पा.पु.व ज. मंडळ व
   मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
   मंत्रालय, मुंबई.
2. मा.रविंद्र माने,
   उपाध्यक्ष, म.पा.पु. व ज.नि.मंडळ,
   व राज्यमंत्री, नगरविकास तथा
   पा.पु.व स्व. विभाग,
   मंत्रालय, मुंबई.
3. श्री.के.नलीनाक्षन,
   सदस्य, म.पा.पु.व ज.नि. मंडळ,
   व प्रधान सचिव, नगर विकास विभाग,
   मंत्रालय, मुंबई..
4. श्री.नानासाहेब पाटील,
   सदस्य, म.पा.पु.व ज. मंडळ,
   व सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
   मंत्रालय, मुंबई.
5. श्री.चां गो. चाबुकस्वार,
   उप सचिव, वित्त विभाग,
   श्री.व्यंकटचारी,
   सदस्य, म.पा.पु.व ज. मंडळ,
   व प्रधान सचिव, वित्त विभाग यांचे प्रतिनिधी.
6. श्री.अरुण घाटे,
   उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
   श्री.रामानंद तिवारी,
   सदस्य, म.पा.पु.व ज.नि..मंडळ,
   मुंबई.
7. श्री.राजेंद्र सगणे,
   सदस्य सचिव, म.पा.पु. व ज. मंडळ,
   मुंबई.

[illegible] खालील अधिकारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

1. श्री.डी.के. भसाळे, मुख्य अभियंता ( नागरी )
2. श्री.श.वि.शेळकीकर, मुख्य अभियंता ( ग्रामीण )
3. श्री.सु.का. पाटील, मुख्य अभियंता ( जा.बँक )
4. श्री.ज.बा. आंबेगावकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी.
5. श्री.भा.आ. डोंगरे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी.

25

6. श्री. अ.ना. अळवणी, अधीक्षक अभियंता ( म.नि.सं.व सं.)
7. श्री. मा.वि. दोमकोंडवार , अधीक्षक अभियंता ( मुख्यालय )

बुधवार दिनांक 22.1.97 रोजी दुपारी 12.00 वाजता मंडळाची 70वी सभा मंडळाचे अध्यक्ष तथा मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा.ना.श्री.अण्णासाहेब डांगे,
   अध्यक्ष, म.पा..पु.व ज. मंडळ,
   व मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
   मंत्रालय,मुंबई.
2. श्री.व्ही.रंगनाथन,
   सदस्य, म.पा.पु.व ज.नि. मंडळ,
   व प्रधान सचिव, पा.पु.व स्व. विभाग,
   मंत्रालय, मुंबई.
3. श्री.नानासाहेब पाटील,
   सदस्य, म.पा.पु. व ज. मंडळ व
   सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
   मंत्रालय, मुंबई.
4. श्री.रा.तु. अिल्हे,
   उपसचिव, वित्त विभाग,
   श्री.व्यंकटचारी, सदस्य,
   म.पा.पु. व ज.. नि. मंडळ व
   प्रधान सचिव, वित्त विभाग यांचे प्रतिनिधी
5. श्री.आर.जी. बर्डे,
   उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
   श्री.रामानंद तिवारी,
   सदस्य, म.पा.पु.व ज.नि मंडळ व सचिव,
   सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,
   मुंबई यांचे प्रतिनिधी.
6. श्री.राजेंद्र सगणे,
   सदस्य सचिव,
   म.पा.पु. व ज. मंडळ,
   मुंबई.

खालील अधिकारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

1. श्री.शं.दा.अरमाळ, मुख्य अभियंता ( कोंकण विभाग )
2. श्री.वि.के. भसाळे, मुख्य अभियंता ( नागपूर विभाग )
3. श्री.शं.वि. शेळकीकर, मुख्य अभियंता ( पुणे विभाग )
4. श्री. ज.बा. आंबेगावकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी.

26

5. श्री. भा.आ. डोंगरे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी.
6. श्री.अ.ना. अळवणी, अधीक्षक अभियंता (म.नि.सं.व सं.)
7. श्री.पी.डी.मोरे, अधीक्षक अभियंता (मुख्यालय)